"खुर्च्या दुरुस्ती" च्या दरनिश्चिती बाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/खुर्च्या दुरुस्ती/दरनिश्चिती/२०२२-२३/(१२)/२०२२/** सी-११८१७

**दिनांक:-** 18 NOV 2022

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.२९/०९/२०२२ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समिती मार्फत करण्यात येते. त्यानुसार **"खुर्च्या दुरुस्ती"** या बाबीची **सन २०२२-२३**या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावा नुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.२९/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत **"खुर्च्या दुरुस्ती"** या बाबीचे निश्चित केलेले दर परिशिष्ट **"अ"** येथील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

१) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटीलि., चेंबूर मुंबई.
२) मे. दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ दफिजिकल हॅन्डीकॅप्ड, ठाणे.
३) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, बांद्रा, मुंबई.
४) मे. ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. विक्रोळी (पश्चिम), मुंबई .

सदर दरनिश्चितीची **विधिग्राह्यता दि.३०.०४.२०२३** पर्यंत किंवा पुढील वर्षाचे दरनिश्चिती आदेश निर्गमित होईपर्यंत यापैकी जी कार्यवाही नंतर होईल तो पर्यंत ग्राह्य राहतील. खुर्च्या दुरुस्ती याबाबी अंतर्गत ज्या वस्तू / बाबीसाठी वस्तू व सेवाकर (GST) लागू असेल, अशा बाबींकरीता GST हा परिशिष्ट 'अ ' मध्ये नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालया पर्यंत मोफत पोहोच असे आहे.

**अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था यांनी संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.**

**पुरवठाकालावधी:-** मागणीपत्र मिळाल्या पासून ०६ आठवड्याच्या आत खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही कामपूर्ण झालेच्या तारखेपासून

१५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तपासणी केल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व कामे पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधी मध्ये खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण न झाल्यास उशीरा खुर्ची दुरुस्ती केलेल्या कामांच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखा पेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंडआकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. खुर्ची दुरुस्ती कामाच्या गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने करावी.

वरील संस्थांनी शासकीय कार्यालयात केलेल्या खुर्ची दुरुस्ती कामाचा अहवाल दरमहा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

सदरचे आदेश मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(वि.मु.सिरसाठ)

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**

**प्रति,**

१) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., दुकान नं. ५४, वत्सलाताई नाईक नगर, श्री.राजेश्वर मेडिकल समोर, स. गो. बर्वे मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

२) मे. दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकल हॅन्डीकॅप्ड, बीबी-१२, राजदर्शन दादा पाटील वाडी, प्लॅटफॉर्म क्र.१ जवळ ठाणे(पश्चिम)-४०० ६०२

३) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थामर्यादित, २/बी/४०८, इंदीरागांधी गृहनिर्माण रहिवासी संघ, प्रो. अनंत काणेकर मार्ग, प्रकाशगड जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

४) मे.ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. १, चव्हाण भवन कम्पाऊंड, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३.

५) निवडनस्ती.

परिशिष्ट"अ"

**सन २०२२-२३ या वर्षा साठी "खुर्च्या दुरुस्ती" या बाबीची दरनिश्चिती.**
**(सदर दरनिश्चितीतील दर हे दि.३०.०४.२०२३ पर्यंत किंवा पुढील वर्षाचे दरनिश्चिती आदेश निर्गमित होईपर्यंत यापैकी जी कार्यवाही नंतर होईल तो पर्यंत ग्राह्य राहतील.)**

| अ.क्र. | दरनिश्चिती बाबींचे नाव | सन २०२२-२३करीता निश्चित केलेले दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **अ)** | **लाकडी खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | किरकोळ खुर्ची दुरुस्ती (लाकडी) | १९.०० प्रत्येकी |
| २. | खुर्चीची सर्वसाधारण दुरुस्ती (लाकडी) | ५८.००प्रत्येकी |
| ३. | खुर्चीला नवीन हात बसविणे (लाकडी) | ५२.०० प्रत्येकी |
| ४. | खुर्चीला नवीन पुढील पाय बसविणे (लाकडी) | ७२.०० प्रत्येकी |
| ५. | खुर्चीला पाठी मागची नविन बाजू बसविणे (लाकडी) | ७१.०० प्रत्येकी |
| ६. | खुर्चीला केनपट्टी नविन बसविणे (लाकडी) | ४१.०० प्रत्येकी |
| ७. | खुर्चीला खालील नवीन पट्टी बसविणे (लाकडी) (फुट रेस्ट) | ४३.००प्रत्येकी |
| ८. | खुर्चीला बाजूस नविन पट्टी बसविणे (लाकडी) | ४०.०० प्रत्येकी |
| ९. | खुर्चीला मजबुती करिता ०३ इंचाची नविन पट्टी बसविणे (लोखंडी) | ०७.५० प्रत्येकी |
| १०. | खुर्चीला मागील पाय बसविणे (फुल लेग) | ७२.०० प्रत्येकी |
| **ब)** | **रिव्हॉल्वींग खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | बॉल कॅस्टर बसविणे | ७२.००प्रत्येकी |
| २. | रिपेरिंग, ऑयलिंग, क्लीनींग | ४८.०० प्रत्येकी |
| ३. | खुर्चीस रंगकाम करणे | ७१.०० प्रत्येकी |
| **क)** | **लोखंडी खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | किरकोळ दुरुस्ती (स्क्रुसहित) | ३२.०० प्रत्येकी |
| २. | चौकट बदलणे (बैठकीची अथवा पाठीमागची बाजू) (नविन) | १५४.००प्रत्येकी |
| ३. | हात बदलणे (लाकडाचा हात बसविणे) स्टिल चेअर हॅण्डल मॉडेल्ड | ६२.००प्रत्येकी |
| ४. | संपुर्ण खुर्चीस रबर बुश बसविणे | ४१.००प्रत्येकी |
| ५. | अधिकाऱ्यांचा फिरत्या खुर्चीचे चाके बदलणे | ७७.००प्रत्येकी |
| ६. | अधिकाऱ्यांच्या खुर्चीची जोडणी करणे (वेल्डींग) | १२४.००प्रत्येकी |
| ७. | रंगकाम करणे | ७४.००प्रत्येकी |
| ८. | पार्टिशनला पॉलीश करणे (प्रति चौ. फुट) | ०९.००प्रत्येकी |
| ९. | खुर्चीस नटबोल्ट बसविणे | ०९.००प्रत्येकी |

| अ.क्र. | दरनिश्चिती बाबींचे नाव | सन २०२२-२३करीता निश्चित केलेले दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १०. | कुशन / साधी खुर्ची दुरुस्ती करणे | १५१.००प्रत्येकी |
| ११. | लोखंडी खुर्चीला वेल्डींग करणे | ४१.००प्रत्येकी |
| १२. | फिरत्या खुर्चीला मशिनसह नविन स्टॅण्ड बसविणे | ९४३.००प्रत्येकी |
| १३. | खुर्चीला मागील पट्टी / बाजूची पट्टी बसविणे | ४१.०० प्रत्येकी |
| १४. | खर्चीचे पाय बसविणे (एकास) | ४१.०० प्रत्येकी |
| १५. | खुर्चीला रबर बसविणे | ०८.००प्रत्येकी |
| १६. | खुर्चीला बैठक / पाठीला प्लायवुड बसविणे (प्रति चौ. फुट) | ५२.००प्रति चौ. फुट |
| १७. | खुर्चीचे विणकाम (फिरत्या खुर्चीची बैठक/ मागील बाजू विणकाम) | १५७.००प्रत्येकी |

(वि.मु.सिरसाठ)
**उद्योग सह संचालक (भां.ख.)**